# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

## सुरक्षा रक्षक (Guards) करिता बंधपत्र

## अटी व शर्ती

महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामध्ये भरती होऊन प्रशिक्षणाकरिता हजर झालेल्या सर्व प्रशिक्षणार्थीचे स्वागत आहे.

## १ आस्थापना विषयक मार्गदर्शक सूचना

१) सुरक्षा रक्षकांची (Guards) सेवा ही ११ महिन्याची कंत्राटी सेवा आहे. सदरची कंत्राटी सेवा ही कायमस्वरूपी नसून महामंडळाकडून त्यांच्या Clients ना मागणीनुसार सेवा देण्यात येते.

२) सदरची सेवा ही कंत्राटी स्वरूपाची असल्यामुळे ती भविष्यात कायमस्वरूपी होणार नाही व या प्रकारची मागणी देखील सुरक्षा रक्षकाला करता येणार नाही.

३) महामंडळाने कंत्राटी स्वरूपात आपणास गार्ड म्हणून स्वीकृत केलेल्या मरासुम कायदयातील तरतूदीनुसार आपण **लोकसेवक** तसेच **विशेष पोलीस अधिकारी** असल्याने आपणास police Forces (Restriction of Right) Act, १९६६ मधील सर्व नियम व तरतुदी बंधनकारक राहतील यास्तव महामंडळाच्या सेवेत असताना आपण कोणत्याही संघटनेचा उदा. राजकीय, कामगार, व्यापारी इ. संघटनेचा (Union) सदस्य होता येणार नाही अथवा संघटना स्थापन करता येणार नाही. तसेच इतर कोणत्याही संघटनेच्या कसल्याही प्रकारच्या कारवायांमध्ये भाग घेता येणार नाही.

४) सुरक्षा रक्षकांची (Guards) नियुक्ती पोलीस चारित्र्य पडताळणी अहवालाच्या व वैद्यकिय चाचणी अहवालाच्या अधिन राहील. तसेच ३ महिन्याच्या आत पोलीस चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास किंवा प्राप्त अहवाल अक्षेपार्ह आढळल्यास आपला कंत्राटी करारनामा केला जाणार नाही अथवा ते तात्काळ रद्द करण्यात येईल.

५) सुरक्षा रक्षकांना (Guards) निवासस्थान, कुठलेही भत्ते (TA/DA) अनुज्ञेय नाहीत.

६) महामंडळाशी केलेल्या कंत्राटानुसार आपण महामंडळाच्या महाराष्ट्रातील कोणत्याही युनिटमध्ये/ जिल्हा/शहर/गांव/कार्यालयात नेमणुकीस पात्र रहाल.

७) आपणाकडुन प्रशिक्षण कालावधीत सिक्युरिटी डिपॉझिट रु.१०,०००/- (रु.५०००/- (non-refundable) आणि रु.५०००/- (Refundable) इतकी रककम घेण्यात येते.

अ) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षण सोडुन गेल्यास सिक्युरिटी डिपॉझिट आपणास अदा केली जाणार नाही.

ब) प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर आपणास आस्थापनेच्या मागणीनुसार आवश्यकतेप्रमाणे महामंडळाकडून कर्तव्यावर बोलाविण्यात येते. कर्तव्यावर हजर झाल्यानंतर पहिला कंत्राटी कालावधी यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर आपणास एक रक्कमी Refundable Security Deposit रु.५०००/-वेतनातून अदा करण्यात येते.

क) प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर कर्तव्यावर नेमणुकीस बोलाविण्यात येते. त्यावेळी आपण कर्तव्यावर हजर न झाल्यास आपणाकडून घेण्यात आलेली Refundable Security Deposit रु.५,०००/- इतकी रक्कम परत करण्यात येणार नाही. तसेच प्रशिक्षणाच्यावेळी प्रशिक्षणासाठी करण्यात आलेला खर्च आपणाकडून वसुल केला जाईल.

८) सुरक्षा रक्षक (Guards) म्हणून सेवेत असतांना अथवा सेवा संपल्यानंतर महामंडळाशी संबंधित कोणतीही गोपनीय माहिती महामंडळाच्या परवानगीशिवाय कोणासही देणार नाहीत. उल्लंघन केल्यास प्रचलित कायदेनुसार कारवाईस पात्र ठराल.

९) सुरक्षा रक्षकाने (Guards) सेवेत येत असताना आधार कार्ड व पॅन कार्ड महामंडळाकडे सादर करणे बंधनकारक आहे. जेणेकरून मासिक मोबदला व भत्ते काढण्यास भविष्यात कोणत्याही अडचणी निर्माण होणार नाहीत.

१०) सुरक्षा रक्षकाची (Guards) सेवा ही महामंडळाच्या अस्तित्वात असलेल्या व भविष्यात तयार होणाऱ्या नियम व आदेशांच्या अधिन असेल.

### प्रशिक्षण कालावधीत मार्गदर्शक सूचना

११) **सुरक्षा रक्षका करिताचे (Guards) मुलभूत प्रशिक्षण हे आठ आठवडयाचे आहे. प्रशिक्षणादरम्यान कोणतीही रजा तसेच वेतन/मानधन अनुज्ञेय राहणार नाही. प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीच्या जेवणाचा संपूर्ण खर्च महामंडळातर्फे देण्यात येईल.** प्रशिक्षण देताना Security Deposit व्यतिरिक्त कोणताही आकार प्रथमत: घेतला जाणार नाही.

१२) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणादरम्यान परिसर सोडता येणार नाही.

१३) प्रशिक्षण कालावधीत अपवादात्मक परिस्थिती वगळता कोणत्याही प्रकारच्या रजा देय नाहीत. प्रशिक्षण कालावधीत १ दिवसांची गैरहजेरीसुध्दा शिस्तभंग विषयक कार्यवाहीस कारणीभूत ठरू शकेल.

१४) प्रशिक्षणादरम्यान फक्त रविवारी सुट्टी असेल तथापि, प्रशिक्षण केंद्र सोडुन जाता येणार नाही.

१५) प्रक्षिणार्थीने प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतरच व चारित्र पडताळणी अहवाल योग्य आल्यानंतरच त्याला नेमणुक देण्यात येईल. प्रशिक्षणाकरीता निवड झालेल्या उमेदवारांना प्रशिक्षणाअंती आंतरवर्ग व बाहयवर्ग परिक्षा दयावी लागेल. परिक्षा उतीर्ण होणाऱ्या प्रशिक्षणार्थीची गुणानुक्रमे निवड सुची (Merit list) तयार करण्यात येईल. या निवड सुची प्रमाणेच प्रशिक्षणार्थीना सेवेत घेण्यात येईल.

१६) प्रशिक्षणादरम्यांन कोणत्याही प्रशिक्षणार्थीने इतर प्रशिक्षणार्थी/ट्रेनर/वस्ताद/महामंडळाचे सदस्य/महिला/ परिसरातील व्यक्ती यांच्याशी गैरवर्तणुक/असभ्य वर्तन/भांडण/जुगार खेळणे/दारु पिणे या सारख्या महामंडळाच्या प्रतिष्ठेस बाधा आणणरी कृती केल्यास **प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण खंडीत करून प्रशिक्षणार्थीला कमी करण्यात येईल व केलेली कृती गैरकायदेशिर असल्यास कायदेशीर कारवाई देखील करण्यात येईल.**

१७) सुरक्षा रक्षका (Guards) पदाकरिता निवड झालेल्या उमेदवारांना विहित वेळेत व दिनांकास संबंधित प्रशिक्षण संस्थांमध्ये हजर राहणे बंधनकारक आहे.

१८) प्रशिक्षण केंद्रामध्ये हजर झाल्यानंतर उमेदवारांना प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत खालील पी.टी.साहित्य प्रशिक्षणार्थीनी स्वत: खरेदी करावयाचा आहे व त्यासाठी महामंडळाने निश्चित केलेला पीटी किट्स भत्ता रु.१४५०/- इतका दिला जाईल.

१. खाकी हाफ पॅन्ट (दोन जोड) - पुरुष प्रशिक्षणार्थी
२. पी.टी टी शर्ट (दोन जोड) - पुरुष प्रशिक्षणार्थी
३. खाकी सॉक्स (दोन जोड) - पुरुष प्रशिक्षणार्थी
४. पी.टी शूज - पुरुष प्रशिक्षणार्थी

त्याचप्रमाणे, प्रशिक्षणार्थीचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर सुरक्षा रक्षक पदावर नेमणुक झाल्यानंतर खालील गणवेष साहित्य प्रशिक्षणार्थीनी स्वत: खरेदी करावयाचा आहे व त्यासाठी महामंडळाने निश्चित केलेला गणवेष भत्ता दिला जाईल.

१. Elite forces च्या धर्तीवर Polyester Viscos-Bottle Camouflage पध्दतीचा खाकी रंगाचा गणवेष (शर्ट +पॅण्ट + कॅप)
२. गणवेषावरील कमरेचा नॉयलन बेल्ट
३. गणवेषावरील शूज
४. गणवेषावरील व्हिसल कॉर्डसह

१९) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षण कालावधीत केवळ शासकीय परिक्षांनांच बसण्यास परवानगी देण्यात येईल. इतर कोणत्याही परिक्षांसाठी परवानगी देण्यात येणार नाही.

२०) अशा नमूद परिक्षेला बसणाऱ्या प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण केंद्राचेच शहर परिक्षा केंद्र म्हणून त्यांच्या अर्जात नमुद करावे. संबंधित परिक्षा केंद्रांवरच प्रशिक्षणादरम्यान परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. या परिक्षेसाठी आदल्या दिवशी संध्याकाळी मुख्यालय सोडण्याची परवानगी दिली जाईल. परिक्षा देवून प्रशिक्षणार्थी हे परिक्षेच्या संध्याकाळी प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षणासाठी हजर होतील. या व्यतिरिक्त इतर केंद्र निवडल्यास परिक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

२१) प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रशिक्षणार्थीनी इस्त्री, हिटर, स्टिमर किटली, टोस्टर,स्टेरिओ आदि इलक्ट्रॉनिक उपकरणे सोबत आणू नयेत. तसेच प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण कालावधीत मौल्यवान /किमती वस्तू (दागदागिने, महागडे गॉगल्स, वाहने, महागडे घडयाळ इ.) सोबत बाळगू नयेत.

२२) प्रशिक्षणार्थीना प्रशिक्षणाचे कालावधीत मैदानावर /लेक्चर हॉल मध्ये मोबाईल फोन वापरण्यास बंदी राहील. आंतरवर्ग प्रशिक्षणाकरीता सर्व प्रशिक्षणार्थीनी स्वत:चे नोटबुक, पेन इ. साहित्य घेवून येणे.

२३) प्रशिक्षण काळामध्ये प्रशिक्षणार्थीनी शक्यतो स्वत:चे विवाह आयोजित करू नये. प्रशिक्षणानंतर विवाह कार्यक्रम ठेवावे. जर धार्मिक अथवा इतर टाळता न येणाऱ्या कारणासाठी विधी करणे अत्यावश्यक असेल अशा प्रकरणात रविवार जोडून एक दिवस रजा देण्यात येईल.

२४) प्रशिक्षण काळामध्ये केवळ आई-वडील/पत्नी-पती/मुलगा-मुलगी (First blood Relationship) यांचे मृत्यु/गंभीर आजारपणासाठीच रजा देणेबाबत विचार करण्यात येईल. आजी-आजोबा, काका-काकू, मामा-मामी,आत्या-मावशी यासारखे इतर नातेवाईकांचे आजारपण व लग्नसोहळयांकरिता रजा देण्यात येणार नाही.

२५) प्रशिक्षण कालावधीत प्रशिक्षणार्थीनी नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणास हजर झाल्यानंतर त्यांना नियम समजावून सांगण्यात येतील.

२६) सदर मार्गदर्शक सूचना व मार्गदर्शक सुचनांसोबतची सहपत्रे www.mahasecurity.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे.

**पोलीस अधिक्षक तथा**
**महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व भरती)**
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ,मुंबई.

वरील सर्व सूचना मी वाचून पाहिल्या. त्या मला मान्य आहेत. वरीलपैकी कोणत्याही सूचनेचे उल्लंघन केल्यास मी कायदेशीर तसेच अनुषांगिक कार्यवाहीस पात्र राहीन.

उमेदवाराचे संपूर्ण नाव -
आधारकार्ड नं.
मोबाईल नं.
दिनांक :

(उमेदवाराची स्वाक्षरी)

# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

---

## हमीपत्र - १

मी ------------------------------------------------ प्रशिक्षणार्थी या व्दारे असे नमुद करते/करतो की, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळामधील प्रशिक्षणात पी.टी ड्रील,ऑबस्टॅकल्स, शस्त्र हाताळणी, गोळीबार सराव, स्फोटकांची हाताळणी,जमाव हाताळणी, विविध खेळ इत्यादी बाबी अंतर्भुत आहेत. हे मला ज्ञात आहे. सदर प्रशिक्षणामधील काही बाबी धोकादायक आहेत. याची मला जाणीव आहे. सदर प्रशिक्षणादरम्यान मला काही इजा /अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी राहील. यासाठी प्रशिक्षण संस्थेमधील कोणीही प्रशिक्षक कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत. मी असेही जाहिर करते/ करतो की, मला कोणताही मोठा आजार अथवा मेडीकल डिसॅबिलीटी नाही.

स्थळ ------------------------

स्वाक्षरी -

नाव -

( )

------------------------------------------

उमेदवाराचे संपूर्ण नाव -
आधारकार्ड नं.
मोबाईल नं.
दिनांक :

(उमेदवाराची स्वाक्षरी)